दिनांक : ०६ फेब्रुवारी, २०१६

# प्र सि ध्दी प त्र क

मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम १२९ नुसार दुचाकी वाहन चालक व त्याच्या मागे बसून प्रवास करणाऱ्या व्यक्तीने 'संरक्षक शिरोवेष्टन' (हेल्मेट) वापरणे बंधनकारक आहे. तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र. ८६/२००३ मध्ये दिलेल्या आदेशानुसार दुचाकी वाहन चालक व त्याच्या मागे बसून प्रवास करणाऱ्या व्यक्तीने हेल्मेट वापरणे अनिवार्य करण्यात आले आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची शासनाची जबाबदारी आहे. सदर आदेशांचे पूर्ण पालन होण्याच्या दृष्टीने दुचाकी वाहन चालकास दुचाकी वाहन चालविण्यासाठी शिकावू अनुज्ञप्ती देतेवेळी त्याचेकडून हेल्मेटच्या वापराविषयी बंधपत्र घेवूनच त्यास सध्या अनुज्ञप्ती दिली जाते. त्याचबरोबर मा. न्यायालयाचे आदेशांची पूर्ण पूर्तता होण्याच्या दृष्टीकोनातून आता दुचाकी वाहन उत्पादकांमार्फत त्यांच्या राज्यातील सर्व वाहन विक्रेत्यांनी दुचाकी वाहन विकतेवेळी खरेदीदारास दोन हेल्मेटस् पुरविण्याविषयी निर्देशित करण्यात येत आहे. तसेच वाहन नोंदणी प्राधिकाऱ्याने वाहन नोंदणीसाठी त्यांचेकडे सादर केल्या गेलेल्या कागदपत्रात वाहनासोबत दोन हेल्मेटस् पुरविण्यात आल्याचे नमूद असल्याबाबत खातरजमा करण्यास निर्देशित करण्यात येत आहे.

वाहन अपघातात दुचाकी वाहन चालविणाऱ्या व्यक्तीने आणि त्याच्या मागे बसणाऱ्या व्यक्तीने हेल्मेट परीधान केले असल्यास अपघाताची तीव्रता नक्कीच कमी होते ही वस्तुस्थिती आहे व त्यामुळे ही बाब विचारात घेवून, तसेच मा. उच्च न्यायालयाने याविषयी दिलेल्या आदेशांचे पालन होण्याच्या दृष्टीकोनातून व हेल्मेट परीधान न केल्यास होणारी संभाव्य कारवाई टाळण्यासाठी दुचाकी वाहन चालकांनी आणि त्याचे मागे बसलेल्या व्यक्तीने वाहन चालवितांना हेल्मेट अनिवार्यपणे परीधान करावे असे सूचित करण्यात येते.

(परिवहन आयुक्त यांचे मान्यतेने)

परिवहन आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई. (करिता)



D/AddTC/letter